# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक १९.०४.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १८.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमांवर कारवाई करून तसेच, एन.डी.पी.एस. कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०७ ईसमांवर कारवाई करूनएकुण ३,७०,४८८/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमांवर कारवाई करून एकुण ७,०६५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,८०३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,७०,६००/—रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आली असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगीरी :— चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक ११.०३.२०२६ चे १३.१० वा. ते १५.१० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, आकाश पॅलेस, बघेल हॉस्पीटल समोर अयोध्यानगर, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादीच्या आई नामे श्रीमती सुनंदा रामदास लोखंडे, वय ५० वर्षे हया त्यांचे राहते घरी एकट्या हजर असतांना त्यांचा परिचीत नातेवाईक विधीसंघर्षग्रस्त बालक याने फिर्यादीचे आईची नजर चुकवून घरातील आलमारीतील रोख ५०,५००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागीने असा एकुण २,२४,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, विधीसंघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याचे ताब्यातुन सोन्या—चांदीचे दागीने असा एकुण ४,४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकास मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि श्रीमती नंदा मनघटे, सपोनि. वैभव बारंगे, पोउपनि. जितेश आरवेल्ली, सफौ. नाजीर शेख, पोहवा. अजय यादव, निलेश ढोणे, भगवती ठाकुर, अतुल चाटे, सतीश ठाकरे, देवेन्द्र नवघरे व प्रकाश राजपल्लीवार यांनी केली.



**<u>३) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत. त्याच अंतर्गत,

दिनांक १८.०४.२०२६ चे २३.५५ वा. ते १९.०४.२०२६ चे ००.५० वा. चे दरम्यान, अंबाझरी पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे हद्दीत गोकुलपेठ मेन रोड, लक्ष्मीकृपा ईमारत येथील हश हेज (एच.एच) कॅफे येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी हुक्का पार्लरचा मॅनेजर चंदन करनसिंग जयगडी, वय २३ वर्ष, रा. कपिल नगर चौक, नागपूर हा त्याचे सोबत काम करणारे १) अरहान अहमद अश्पाक अहमद, वय १९ वर्षे, रा. जाफर नगर, वेटर क्र. २) तक्षक युवराज भवरे, वय २० वर्ष रा. कपिलनगर, नागपूर यांचेसह संगणमत करून ईतर आरोपी ०४ ग्राहकांना प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हे कॅफे मालक पाहिजे आरोपी नामे तेजस संजय सरदार, वय २८ वर्षे, रा. पाटणकर चौक, नागपूर याचेसह संगणमताने स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण ९,५४०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींचे विरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम २७४ भा.न्या.स. सहकलम ५, ७, २० सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८ सहकलम ३३, १३३ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. विलास शेंडे, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. विनोद गोडबोले, पोउपनि. नंदकिशोर पदकोंडे, नानाभाऊ काकड, पोहवा. गयाप्रसाद यादव, अमीत यांनी केली.

(गुन्हे)

**<u>पोलीस ठाणे लकडगंज :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, जुनी मंगळवारी, साई पान पॅलेसचे बाजूला, सी. ए. रोड येथे फिर्यादी राजू रामेश्वर पौनिकर, वय ३५ वर्षे, रा. राखुंडे नगर, प्लॉट नं. १२८, खरबी, नागपूर यांचे सिध्देश्वर ट्रेडींग नावाचे धान्याचे दुकान आहे. दिनांक १७.०४.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक १८.०४.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी आपले दुकानासमोर त्यांची बुलेट गाडी क्र. एम.एच. ४९ ए.यु. ५५६९ किंमती ८०,०००/—रू. ची हॅन्डल लॉक करून गाडीची चाबी दुकानाचे आंत ठेवून दुकानाला कुलुप लावुन आपले कारने घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा

तोडुन, आंत प्रवेश करून, दुकानातील ड्रावरमधील रोख ५०,०००/— रु. व बुलेटची चाबी घेवून बुलेट गाडी असा एकूण १,३०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. कांबळे ८३०८३०६५७६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे सक्करदरा</u> :—** दिनांक १८.०४.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, आनंद नगर, वॉलीबॉल ग्राऊंड येथील टिनाचे शेडमध्ये एक अनोळखी ईसम विजय नाव असलेले वय अंदाजे ५५ वर्षे पुर्ण नाव पत्ता नाही हे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यापकरणी फिर्यादी शेरखान शमशेरखान पठान, वय ४९ वर्षे, रा. सोमवारी कॉर्टर, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे सपोनि. प्रदिप होळगे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. ४ थे सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०८००६० /२००५ | कलम ८२ सी.आर.पी. सी. प्रमाणे | १) प्रभुदयाल छबीलाल चौधरी, वय ४९ वर्षे, रा. प्लॉट नं. ४०, भवानी नगर, पारडी नाका, नागपूर २) श्याम हरीजी सुर्यवंशी, वय ३१ वर्षे, रा. बामणी ता. पवनी, जि. भंडारा, ह.मु. जुनी शुक्रवारी गांधी चौक, जयस्वालचे घरी किरायाने नागपूर | २१.०४.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**